# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या ३१ व्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक : १८ ऑगस्ट, २०२६**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११(२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची ३१ व्या बैठक दि. १८ ऑगस्ट, २०२६ रोजी बैठक रुम क्र. ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, सेवानिवृत्त सचिव, अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ. मुरलीधर मुक्ताबाई गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ३ | श्री.नितीन बापुराव चव्हाण सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री. श्रीकांत निर्मल मोहन लिमय सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | श्री.अतुल दामोदर धारप परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ६ | श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | डॉ. दत्तात्रय वेनुबाई व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.) पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण<br>प्रतिनिधी डॉ.सुनिल लिलानी , विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय. | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण<br>प्रतिनिधी डॉ. संदीप काळे, सहाय्यक प्राध्यापक, आर.ए.पी.एम.सी., मुंबई. | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण प्रतिनिधी डॉ.किशोर शिंदे, संचालक शिक्षण. | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| १३ | डॉ. राजेंद्र शि.बंगाळ, कुलसचिव,<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक,<br>निमंत्रित सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| १४ | डॉ. विनायक राव उपाध्ये, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर आणि डॉ. सलील तुकाराम हांडे, प्राध्यापक व विभागप्रमुख, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, पनवेल निमंत्रित /तज्ज्ञ सदस्य. | उपस्थित |
| १५ | श्री समीर कुर्तकोटी, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

विषय क्र.१: **शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता नव्याने सुरू करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या तदर्थ शुल्क (Ad-hoc fee) निश्चितीबाबत.**

"चर्चा झाली.

विचारविनिमयानंतर प्राधिकरणाने शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून नव्याने सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या संदर्भात विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांकडून आकारण्यात येणारे तदर्थ शुल्क (Ad-hoc fee) खालीलप्रमाणे निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

**(A) Higher & Technical Courses:**

| Sr. No. | Course | Adhoc Fees Per student (Rs.) |
|---|---|---|
| 1 | MBA Integrated Programme (5 years duration) | **75,000/-<br>Seventy Five Thousand Only** |

| Sr. No. | Course | Adhoc Fees Per student (Rs.) |
|---|---|---|
| 2 | MCA Integrated Programme (5 years duration) | **85,000/-**<br>**Eighty Five Thousand Only** |
| 3 | Bachelor of Business Administration (B.B.A)/ Bachelor of Computer Applications (B.C.A)/<br>Bachelor of Management Studies (B.M.S) | **40,000/-**<br>**Forty Thousand Only** |
| 4 | Pharm.D. (Post Baccalaureate) | **90,000/-**<br>**Ninety Thousand Only** |

**B) Health & Science Courses:**

| Sr. No. | Course | Adhoc Fees Per student (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Bachelor of Naturopathy and Yogic Sciences (B.N.Y.S) | **1,50,000/-**<br>**One Lakh Fifty Thousand Only** |

**C) Agriculture Courses:**

| Sr. No. | Course | Adhoc Fees Per student (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry (B.V.Sc. & A.H) | **5,50,000/-**<br>**Five Lakh Fifty Thousand Only** |
| 2 | Bachelor of Technology (Dairy Technology) (B.Tech.( D.T.) | **1,00,000/-**<br>**One Lakh Only** |

**विषय क्र.२: शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या अंतरिम शुल्क (Interim fee) प्रस्तावांचे अंतिम शुल्क निश्चित करण्याबाबत.**

"चर्चा झाली.

प्रस्तुत बाबीचा सविस्तर व योग्य विचार केल्यानंतर, प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

१. शुल्क नियामक प्राधिकरणाकडे सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क निश्चितीसाठी २४४६ प्रस्ताव प्राप्त झाले होते.

२. यापैकी दिनांक १७.०७.२०२६ पर्यंत १६०२ प्रस्तावांवर शुल्क निश्चिती करण्यात येऊन सदरचे निश्चित करण्यात आलेले शुल्क जाहीर करण्यात आलेले होते.

३. दिनांक १७.०७.२०२६ रोजी प्राधिकरणाकडे शुल्क निश्चिती करावयाच्या प्रक्रीयेतील प्रकरणी, सदरच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया व शैक्षणिक वर्ष लवकरच सुरु होत असल्यामुळे, वर्ष २०२५-२०२६ मध्ये मंजूर/प्रमाणित शुल्क महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) सुधारणा अधिनियम, २०२६,अधिनियमाचे कलम १४(२) अन्वये आंतरिम शुल्क म्हणून मंजूर करण्यात आले होते.

४. B.B.A, B.M.S व B.C.A या अभ्यासक्रमांचे सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ५३३ प्रस्ताव प्राप्त झाले होते.

५. सन २०२६–२०२७ मध्ये सदरच्या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्याचे काम प्रथमच प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेले आहे व यापूर्वी प्राधिकरण या अभ्यासक्रमांसाठी शुल्क निश्चिती करीत नव्हते.

६. B.B.A, B.M.S व B.C.A या अभ्यासक्रमांचे सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांपेकी ९५ प्रस्तावांत दिनांक १७.०७.२०२६ पूर्वी शुल्क निश्चिती करण्यात येऊन निश्चित करण्यात आलेले शुल्क जाहीर करण्यात आले आहे.

७. काही महाविदयालयांनी त्यांच्या वरील अभ्यासक्रमांसाठी वर्ष २०२६–२०२७ साठी प्राधिकरणाकडे सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये मागणी केलेले शुल्क हे आंतरिम शुल्कापेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे, अशा प्रकरणी त्यांनी मागणी केलेले शुल्क अंतीम करण्यात येत आहे.

८. B.B.A, B.M.S व B.C.A या अभ्यासक्रमांचे सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्राप्त प्रस्तावांपैकी 438 प्रस्तावांत असलेली माहिती, सदर प्रस्तावांची तपासणी केलीअसता, प्राधिकरणाने योग्य शुल्क निश्चित करण्याचे दृष्टीने अपूर्ण आणि सुसंगत नसल्याचे आढळून आले आहे.

९. तसेच सदरच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया व शैक्षणिक वर्ष सुरु झाले असल्याने सदरचे प्रकरणी, सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर अथवा प्रमाणित असलेले शुल्क हेच अंतीम शुल्क म्हणून प्राधिकरण या ठरावाव्दारे निश्चित करीत आहे.

सदरच्या अभ्यासक्रमांचे निश्चित केलेल्या शुल्काचा तपशील सोबतच्या परिशिष्टामध्ये जोडला आहे.

सर्व महाविदयालयांनी याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ अवगत करावे".

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

विषय क्र.३: तातडीच्या न्यायालयीन प्रकरणांबाबत कार्यवाही करणे.
**मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ कोल्हापूर येथे लोकनेते राजारामबापू पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व हास्पिटल (कोड BAMS0022) यांनी दाखल केलेल्य रिट याचिका क्र १७६९/२०२६ .**

"चर्चा झाली.

दिनांक २७ व २८ जुलै, २०२६ रोजीचा ठरावाबाबत प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आला, जो पुढीलप्रमाणे आहे :

*"सर्व विचारविनिमयानंतर, दिनांक* **२७/०७/२०२६** *रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत असे निर्णय घेण्यात आला की, संस्थेला दूरध्वनीद्वारे संपर्क साधून ऑनलाइन सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.*

*त्यानुसार, संस्थेशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला व नियोजित ऑनलाइन सुनावणीबाबत माहिती देण्यात आली. तथापि, संस्थेने कळविले की, नियोजित वेळेत सदर सुनावणीस उपस्थित राहणे त्यांना शक्य होणार नाही.*

*संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, प्राधिकरणाने वैयक्तिक सुनावणी पुढील दिवशी म्हणजेच* ***दिनांक २८/०७/२०२६ रोजी दुपारी २:३० वाजता*** *घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, संस्थेला सुधारित वेळापत्रकाबाबत कळविण्यात आले, तसेच, याचिकेच्या समर्थनार्थ अवलंबून असलेली सर्व संबंधित कागदपत्रे, अभिलेख व पुरावे तसेच दाव्यांची पुष्टी करण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही कागदपत्रे वैयक्तिक सुनावणीच्या वेळी प्राधिकरणासमोर सादर करण्याचे संस्थेला निर्देश देण्यात आले.*

*खालील व्यक्ती दिनांक २८/०७/२०२६ रोजी उपस्थित होत्या:*

1. *श्री. निशिकांत पी. पाटील - संस्थेचे संस्थापक.*
2. *डॉ. अभिमन्यू एस. पाटील - संस्थेचे अधिष्ठाता (डीन).*
3. *श्री. विवेक शेवाळे - संस्थेचे मुख्य वित्त अधिकारी .*

*सुनावणी घेण्यात आली.*

*संस्थेचे संस्थापक श्री. निशिकांत पी. पाटील यांनी सादर केले की, शुल्क नियामक प्राधिकरणाने (FRA) शुल्क कमी करण्याबाबत निकष निर्धारित केले आहेत; तथापि, अपवादात्मक परिस्थितींमध्ये शुल्कवाढ मंजूर करण्यासंदर्भात कोणतेही विशिष्ट निकष निर्धारित केलेले नाहीत. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, शुल्क विनियामक प्राधिकरणामार्फत आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाइन सुनावण्यांमध्ये संस्थेची बाजू पुरेशा प्रमाणात विचारात न घेता निर्णय घेण्यात आले. परिणामी, संस्थेने प्रस्तावित केलेली शुल्कवाढ मंजूर करण्यात आलेली नाही.*

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

*तसेच, प्राधिकरणाच्या निर्णयामुळे संस्थेला न्याय मिळाला नसल्याने, संस्थेला मा. उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे भाग पडले. त्यांनी असेही नमूद केले की, मा. उच्च न्यायालयाने संस्थेच्या शुल्क प्रस्तावाचा निर्णय*

घेताना पी. ए. इनामदार विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर (2005) या प्रकरणातील तत्वांचा विचार करण्याचे निर्देश प्राधिकरणास दिले आहेत.

श्री. निशिकांत पी. पाटील यांनी पुढे असेही सादर केले की, संस्थेस NAAC कडून B+ श्रेणी प्राप्त झाली असून, तसेच क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) कडून 'A' श्रेणी प्राप्त झाली आहे. संस्थेने अवलंबिलेल्या निकषांनुसार, 'A' श्रेणी प्राप्त संस्थेस सलग दोन वर्षांसाठी 5% शुल्कवाढ देण्याची तरतूद आहे. वरील निवेदनाच्या समर्थनार्थ त्यांनी संबंधित कागदपत्रांच्या हार्ड प्रती देखील प्राधिकरणासमोर सादर केल्या.

श्री अतुल डी. धारप, परिव्यय लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरणाचे मा. सदस्य यांनी नमूद केले की, यापूर्वीची शुल्कवाढ संबंधित खर्चवाढीच्या घटकांचा विचार करून निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार प्रारंभी १०% शुल्कवाढ मंजूर करण्यात आली होती व त्यानंतर अतिरिक्त १५% शुल्कवाढ मंजूर करण्यात आली. तसेच शुल्कवाढ निश्चित करताना संस्थेच्या NAAC मानांकनाचाही विचार करण्यात आला होता.

श्री. नितीन चव्हाण, सनदी लेखापाल आणि श्री. अतुल डी. धारप, परिव्यय लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरणाचे मा. सदस्य यांनी संस्थेस वेतन आयोगाच्या अंमलबजावणीसंदर्भातील संपूर्ण तपशील, तसेच संबंधित कागदपत्रे, गणना व आवश्यक पूरक नोंदी सादर करण्याचे निर्देश दिले.

शुल्क नियामक प्राधिकरणाचे मा. अध्यक्षांनी बँक व्याज खर्चामध्ये झालेल्या वाढीच्या आधाराबाबत विचारणा करून त्यासंदर्भात स्पष्टीकरण मागितले. तसेच, संस्थेने नियुक्त केलेल्या प्रत्येक कर्मचारी सदस्यास सक्षम परिषदेची मान्यता प्राप्त आहे का, याबाबतचा तपशीलही मा. अध्यक्षांनी मागविला.

शुल्क नियामक प्राधिकरणाचे मा. अध्यक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने, संस्थेचे संस्थापक श्री. निशिकांत पी. पाटील नमूद केले की, सदर ट्रस्ट हा कंपनी अधिनियमाच्या तरतुदींअंतर्गत येत असल्यामुळे, त्यानुसार मोठी वाढ दर्शविण्यात आली आहे. तसेच, संस्थेचे संस्थापकांनी पुढे नमूद केले की, प्राधिकरणाने यासंदर्भात मागविलेली सर्व कागदपत्रे व नोंदींच्या छायांकित प्रती (Hard Copies) पडताळणी व पुढील विचारार्थ तातडीने सादर करण्यात येतील.

सादर करण्यात आलेल्या निवेदनाचा विचार करून तसेच सविस्तर चर्चा केल्यानंतर, प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की, संस्थेने दावा केलेल्या खर्चातील अचानक झालेल्या वाढीबाबत सविस्तर स्पष्टीकरण व त्यासंबंधीची समर्थनाथ कागदपत्रे त्वरित सादर करावीत.

सदर स्पष्टीकरण व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर, 'महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्क यांचे विनियमन) अधिनियम' मधील २०२६ च्या सुधारणा कायद्यानुसार तसेच शुल्क नियामक प्राधिकरणाने (FRA) विहित केलेल्या नियम, निकष व मार्गदर्शक तत्वांनुसार प्रकरणाचा पुढील निर्णय प्राधिकरणाकडून करण्यात येईल".

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

सदर बाबीचा सविस्तर व योग्य विचार केल्यानंतर, प्राधिकरणाने संस्थेच्या अधिष्ठात्यांना दिनांक २४/०८/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता प्राधिकरणासमोर वैयक्तिक सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास बोलावण्याचे ठरविले आहे. संबंधित संस्थेस त्यानुसार कार्यालयामार्फत कळविण्यात यावे."

विषय क्र.४: **शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ करिता शुल्क पुनर्विलोकनबाबत (Review Application) विचार करण्याबाबत**.

"सदर प्रकरणी वेळेअभावी चर्चा झाली नाही".

विषय क्र.५: **शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करिता शुल्क निश्चितीबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाइन लिंक सुरु करण्याबाबत चर्चा**.

"सदर प्रकरणी वेळेअभावी चर्चा झाली नाही".

विषय क्र.६: **शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करिता शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्याचे निकष अद्यावत करणेबाबत चर्चा** .

"सदर प्रकरणी वेळेअभावी चर्चा झाली नाही".

विषय क्र.७: **दि. ४/८/२०२६ रोजीच्या बैठकीत माननीय श्री.चंद्रकांत(दादा) पाटील, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांनी शुल्क नियामक प्राधिकरणासंदर्भात खालील दिलेल्या मुद्द्यांवर चर्चा करण्याबाबत;**

अ) FRA कायद्यामध्ये नमुद केल्यानुसार शिक्षण शुल्कामध्येच (Tuition fees) विकास शुल्काची (Development Fees) परिगणना करण्याकरिता कार्यपध्दती तयार करणे. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांवर लादली जाणारी विकास शुल्काची (Development Fees)रक्कम कमी करणे.

आ) Increase Scope of Work:-

i. Inclusion of Self Finance University in FRA Jurisdiction.
ii. Inclusion of Diploma Engineering in FRA Jurisdiction which is under FFC today date.
iii. Inclusion of Autonomous Institutes (Higher & Technical Education) in FRA Jurisdiction.

इ) Composition of scrutiny committee

ई) शुल्क नियामक प्राधिकरण येथील पदे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या आकृतीबंधात दर्शवुन आकृतीबंधास मान्यता घेणे.

उ) शुल्क नियामक प्राधिकरणात प्राप्त प्रस्तावांची छाणणी करण्यासंदर्भातील कार्यपध्दती प्रसिध्द करणे.

"सदर प्रकरणी वेळेअभावी चर्चा झाली नाही".

दिनांकः १८ ऑगस्ट,२०२६
ठिकाणः मुंबई

(शेखर माधूरी मनोहर चन्ने,भा.प्र.से.(से.नि.सचिव)
अध्यक्ष,
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य